नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १७४ Issue - 174 | वार सोमवार दि. ११ नोव्हेंबर २०२४ Blow- Monday Date 11 November 2024 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# भाजपचा संकल्पपत्र, मविआचा महाराष्ट्रनामा जाहीर

## महिला, शेतकऱ्यांवर आश्वासनांची खैरात; मविआचा 'महाराष्ट्रनामा' जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





मुंबई : महिलांना महिना ३००० रुपये, ५०० रुपयांमध्ये वर्षाला सहा सिलिंडर, मासिक पाळीच्या काळात दोन दिवसांची ऐच्छिक रजा, सर्व नागरिकांना १०० युनिट मोफत वीज, २.५ लाख सरकारी रिक्त पदे भरणे तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी शक्ती कायदा अशी विविध आश्वासने असणारा महाविकास आघाडीचा 'महाराष्ट्रनामा' रविवारी प्रकाशित करण्यात आला.

महाविकास आघाडी सरकार सत्तेत आल्यानंतर पहिल्या १०० दिवसांत काय कामे करणार व पाच वर्षांत काय कामे करणार याचे आश्वासन जाहीरनाम्यातून देण्यात आले आहे. ही निवडणूक फक्त महाराष्ट्रासाठी नाही तर देशाचे भविष्य बदलणारी आहे. महाराष्ट्राच्या जनतेसाठी शेतकरी, तरुण, महिलांसाठी हे सरकार घालवणे गरजेचे आहे. भाजप युतीचे खोके सरकार सत्तेतून खाली खेचून महाविकास आघाडीचे आणा असे आवाहन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी यावेळी केले. जाहीरनामा प्रकाशन समारंभाला खरगे यांच्यासह शिवसेनेचे (ठाकरे) खासदार संजय राऊत, राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे, काँग्रेसचे सरचिटणीस वेणुगोपाळ, रमेश चेन्नीथला, बाळासाहेब थोरात आदी उपस्थित होते.

## 'राज्याला तंत्रज्ञानाची राजधानी बनवणार',भाजपकडून वचनांचा पाऊस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राला जागतिक 'फिनटेक' व कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय) राजधानी बनविण्याबरोबरच ५० लाख महिलांना लखपती दीदी, १० लाख नवीन उद्योजक, २५ लाख रोजगारनिर्मिती, १० लाख विद्यार्थ्यांना दरमहा १० हजार रुपये, अक्षय अन्न योजनेत कमी उत्पन्न गटातील कुटुंबांना मोफत शिधा आदी आश्वासने भाजपच्या 'संकल्प पत्रा'त देण्यात आली आहेत.




भाजपच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपचे वरिष्ठ नेते उपस्थित होते. महायुतीच्या दशसूत्री व्यतिरिक्त शेकडो आश्वासने भाजपने आपल्या जाहीरनाम्यात दिली आहेत. सोयाबीन, कापूस व अन्य उत्पादनांना किमान आधारभूत किमतीनुसार भाव मिळावा आणि त्यापेक्षा कमी दर बाजारपेठेत मिळाल्यास फरकाची रक्कम सरकार शेतकऱ्यांना देण्याचे आश्वासन भाजपने दिले आहे. महाराष्ट्र २०२७ पर्यंत डाळ उत्पादनात आत्मनिर्भर करण्यासाठी प्रक्रिया केंद्रे उभारण्यात येतील. शेती उत्पादने निर्यातक्षम करण्यासाठी पॅकिंग हाऊसची उभाणी करून साठवण क्षमता व प्रक्रिया सुविधा तयार केल्या जातील. शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतांवरील एसजीएसटी अनुदान स्वरूपात परत करण्यात येईल, अशी अनेक आश्वासने भाजपच्या जाहीरनाम्यात येण्यात आली आहेत.

## दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत एक जवान शहीद, तर तीन जवान जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : जम्मू काश्मीरमधील किश्तवाड जिल्ह्यात दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत भारतीय सुरक्षा दलाचा एक जवान शहीद झाला आहे, तर अन्य तीन जवान जखमी झाले आहेत. किश्तवाडमधील कुंतवारा व केशवान या भागातील घनदाट जंगलात दोन दहशतवादी लपले असल्याची माहिती सुरक्षा दलाला मिळाली होती. त्यानुसार, भारतीय सुरक्षा दल व जम्मू काश्मीर पोलीसांकडून संयुक्तपणे शोधमोहीम राबवण्यात आली. शोधमोहीमेवेळी दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत नायब सुभेदार राकेश कुमार हे शहीद झाले, तर अन्य तीन जवान जखमी झाले आहेत. भारतीय सुरक्षा दलाच्या 'व्हाईट नाईट कॉर्प्स' या अधिकृत एक्स (ट्विटर) खात्यावरून याबाबत माहिती देण्यात आली आहे.

शोधमोहीम सुरू असताना दहशतवाद्यांसोबत झालेल्या चकमकीत नायब सुभेदार राकेश कुमार व अन्य तीन जवान जखमी झाले होते. चौघांना उपचारांसाठी उधमपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, उपचार सुरू असताना राकेश कुमार यांची प्राणज्योत मालवली, तर अन्य तीन जखमी जवानांवर सध्या उपचार सुरू आहेत. राकेश कुमार हे २ पॅरा एसएफमध्ये (स्पेशल फोर्सेस) कार्यरत होते. दहशतवाद्यांनी केलेल्या ह्या भ्याड हल्ल्यानंतर सुरक्षा दल व जम्मू काश्मीर पोलिसांकडून घटनास्थळी व्यापक स्वरुपात शोधमोहीम सध्या सुरू आहे. जवानांवर हल्ला झाला त्या ठिकाणाहून काही अंतरावरच काल (९ नोव्हेंबर) ग्राम संरक्षण दलातील दोन जवानांचे मृतदेह आढळून आले होते. ग्राम संरक्षण दलातील नाझिर अहमद व कुलदीप कुमार या दोन जवानांचे दहशतवाद्यांनी अपहरण केले होते. त्यानंतर दोघांची हत्या केली. जैश-ए-मोहम्मदचा गट काश्मीर टायगर्सने या हत्येची जबाबदारी स्वीकारली आहे.

# वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा सज्ज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : कार्तिक शुद्ध एकादशी १२ नोव्हेंबर २०२४ रोजी असून, या कार्तिकी यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. वारी कालावधीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांनी दिली.

- ■ १ हजार ६२५ पोलीस अधिकारी व कर्मचारी
- ■ चार ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्र
- ■ वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी माऊली स्कॉड

कार्तिक वारीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतुक नियत्रंणासाठी १ हजार ६२५ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये एक पोलीस अधिक्षक, एक अप्पर पोलीस अधिक्षक, १० पोलीस उपअधिक्षक, २३ पोलीस निरिक्षिक, ९० सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, १ हजार पोलीस कर्मचारी व ५०० होमगार्ड तसेच ०१ एसआरपीएफ कंपनी, दोन बीडीएस पथके नियुक्त करण्यात आले आहेत.

वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नदीपात्र, ६५ एकर, महाव्दार, महाव्दार घाट, पत्राशेड यासह आदी ठिकाणी १० वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत. वारकरी भाविकांना संरक्षण देण्यासाठी तसेच चोरी रोखण्यासाठी माऊली स्कॉडची स्थापन करण्यात आले असून यामध्ये वारकरी व नागरिकांच्या वेशात पोलीस अधिकारी



उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांची माहिती

तैनात करण्यात आले आहेत. तसेच १५० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून देखील लक्ष ठेवले जाणार आहे. वारकऱ्यांच्या मदतीसाठी सावरकर चौक, शिवाजी चौक, चंद्रभागा वाळवंट तसेच अंबाबाई पटांगण येथे तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. वारकरी भाविकांना आवश्यक सूचना देण्यासाठी ध्वनीक्षेपन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली.

वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये भाविकांना वाहुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशान्वये जड वाहतुक शहराबाहेरुन वळविण्यात आली आहे . तसेच वाहतुक नियमनासाठी १३ ठिकाणी डायव्हरशन पॉईट सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर खाजगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात व शहराबाहेर १६ ठिकाणी वाहनतळ व्यवस्था करण्यात आली आहे. वारकरी भाविकांनी सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करुन सहाकार्य करावे असे, आवाहनही उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.भोसले यांनी केले आहे.

## दाट धुक्यामुळे चार वाहनांचा विचित्र अपघात; वाहनांचे नुकसान तर जीवितहानी टळली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



चिपळूण : मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर परशुराम घाटात रविवारी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास मोटारसायकल, एसटी, ट्रक आणि कार यांचा विचित्र भीषण अपघात झाला. या अपघातात एसटी बसमधील प्रवासी जखमी झाले. तर चारही वाहनांची मोठी हानी झाली. परशुराम घाटात दाट धुक्यामुळे हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे. अपघातामध्ये एसटी चालक जखमी झाल्याची माहिती आहे. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन अपघाताची पहाणी केली.

सुदैवाने या चार वाहनांच्या अपघातात एसटीमधील प्रवासी बचावले आहेत. या अपघातानंतर मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर परशुराम घाटात एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. चिपळूनकडून खेडच्या दिशेने येणारी एसटी आणि समोर येणाऱ्या ट्रक यांच्यात अपघात झाला आहे. यामध्ये मागून येणारी कार एसटीवर जोरदार आदळल्याने हा मोठा अपघात झाला. एक कारचालक तर यामध्ये दुचाकीस्वारही जखमी झाला आहे. तर एसटी चालकही जखमी झाल्याची माहिती आहे. एसटी बसमधून काही लोक दापोलीकडे पर्यटनासाठी निघाल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघातातील जखमींना जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### लोह्यात एकनाथ दादा पवार यांच्या प्रचारार्थ उध्दव ठाकरे यांच्या सभेला हजारोचा जनसागर उसळला

### माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांचे प्रतिपादन

# महाविकास आघाडीचे सरकार आल्यास लाडक्या बहिणीला ३ हजार रुपये व शेतकऱ्यांचे कर्जमाफी करू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा / प्रतिनिधी : राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यास लाडक्या बहिणीला ३ हजार रुपये महिना सुरू करून शेतकऱ्यांचे कर्ज पुन्हा माफ करूत यासाठी महाविकास आघाडीला निवडून द्या असे आवाहन राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी लोहा येथे शिवसेना उबाठा, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या महाविकास आघाडीचे लोहा विधानसभेचे अधिकृत उमेदवार एकनाथ दादा पवार यांच्या प्रचारार्थ आयोजित परिवर्तन सभेत केले.

लोहा विधानसभेचे शिवसेना महाविकास आघाडीचे उमेदवार एकनाथ दादा पवार यांच्या प्रचारार्थ दि. ९ नोव्हेंबर २०२४ रोजी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत परिवर्तन सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी व्यासपीठावर शिवसेनेचे सचिव मिलिंद नार्वेकर लोहा विधानसभेचे शिवसेना महाविकास आघाडीचे उमेदवार एकनाथ दादा पवार, काँग्रेसचे खासदार शिवाजीराव काळगे , शिवसेनेचे लातूर जिल्हा संपर्कप्रमुख तथा माजी आमदार रोहिदास चव्हाण, काँग्रेसचे माजी आमदार ईश्वरराव भोसीकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर, शिवसेनेचे नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात, सहसंपर्कप्रमुख मुक्तेश्वर धोंडगे, शिवसेनेचे लातूर जिल्हा प्रमुख बालाजी रेड्डी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्र महाविकास आघाडीचे सरकार असताना मोदी,शहा कायच भाजपाचे ही महाराष्ट्राकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत नव्हती. आता येथील सर्व उद्योग गुजरातला पळवून नेलेत. महाराष्ट्रात मराठवाडा, विदर्भ ,कोकण सगळीकडे उद्योग सुरू करुन येथील युवकांना रोजगार द्यायचा होता पण मोदी - शहांनी येथील उद्योग गुजरातला नेले. भाजपा व मिध्देच्या पोस्टर बघा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो आहे. येथे महाराष्ट्रात मोदी -शहाची गॅरंटी चालणार नाही तर बाळासाहेबांची फोटो चालेल.





भाजपावाले म्हणतात मला आदित्य ठाकरे व शरद पवार यांना सुप्रिया सुळे यांना मुख्यमंत्री करायचे पण अमित शहा तुम्ही तुमच्या ह्रदयावर हात ठेवून सांगा तुम्हाला पंतप्रधान व्हायचे की नाही . तुम्ही तुमच्या मुलाला जय शहा यांना क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष केले त्यांना क्रिकेट खेळता येते का? स्वतः चे ठेवायचे झाकून लोकांचे पाहायचे वाकुन असे चालणार नाही. मोदीजीची धुळ्यात सभा झाली महाराष्ट्र त्यांना धुळ चालणार आहे. येत्या २० तारखेला भ्रष्टाचाराचे चाके असलेल्या महायुतीला महाराष्ट्रातून तडीपार करा. येणारे सरकार आमचे आहे. तुम्हला सुरतेला जाऊ देयाचे नाही. मला एकनाथ पवार यांनी सांगितले येथे दुसरा डमी एकनाथ पवार यांना उभे केले आहे.यांचे सर्वच डमी आहेत. यांनी माझा पक्ष चोरला ,चिन्ह चोरले, आता एकनाथ पवार यांना चोरले या गद्दाराच्या हाती तुम्ही सता देणार का? असा सवाल त्यांनी जनतेला केला व महाराष्ट्राच्या हितासाठी महाविकास आघाडीला विजयी करा असे आवाहन केले. तसेच बाजुच्या नांदेड लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवाराला विजयी करा व काँग्रेसवाल्यांनी मशालीला विजयी करावे असे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले.

यावेळी कार्यक्रमांचे सूत्रसंचालन विक्रम कदम यांनी केले तर आभार संजय भोसीकर यांनी मानले. यावेळी सभेला हजारोचा जनसागर उपस्थित होता. सभा यशस्वी करण्यासाठी शिवसेनेचे लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक साहेबराव पाटील काळे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संजय ढेपे, शिवसेनेचे लोहा तालुकाप्रमुख संजय पाटील ढाले, काँग्रेसचे लोहा तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार, काँग्रेसचे कंधार तालुकाध्यक्ष बालाजी पांडागळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे लोहा तालुकाध्यक्ष प्रभाकर पाटील पवार, शिवसेनेचे शहरप्रमुख खंडू पाटील पवार, युवा सेनेचे सेनेचे जिल्हा समन्वयक योगेश पाटील नंदनवनकर, युवा सेनेचे लोहा -कंधार विधानसभा प्रमुख सतीश पाटील बाबर , युवा सेनेचे लोहा अधिकारी गजानन पाटील मोरे, रूद्रा पाटील भोस्कर, यांच्या सहित महाविकास आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## संपादकीय....

# भ्याड हल्ले सुरुच

जम्मू काश्मीरमधील किश्तवाड जिल्ह्यात दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत भारतीय सुरक्षा दलाचा एक जवान शहीद झाला आहे, तर अन्य तीन जवान जखमी झाले आहेत. किश्तवाडमधील कुंतवारा व केशवान या भागातील घनदाट जंगलात दोन दहशतवादी लपले असल्याची माहिती सुरक्षा दलाला मिळाली होती. त्यानुसार, भारतीय सुरक्षा दल व जम्मू काश्मीर पोलीसांकडून संयुक्तपणे शोधमोहीम राबवण्यात आली. शोधमोहीमेवेळी दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत नायब सुभेदार राकेश कुमार हे शहीद झाले, तर अन्य तीन जवान जखमी झाले आहेत. शोधमोहीम सुरू असताना दहशतवाद्यांसोबत झालेल्या चकमकीत नायब सुभेदार राकेश कुमार व अन्य तीन जवान जखमी झाले होते. चौघांना उपचारांसाठी उधमपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, उपचार सुरू असताना राकेश कुमार यांची प्राणज्योत मालवली, तर अन्य तीन जखमी जवानांवर सध्या उपचार सुरू आहेत. राकेश कुमार हे २ पॅरा एसएफमध्ये (स्पेशल फोर्सेस) कार्यरत होते. दहशतवाद्यांनी केलेल्या ह्या भ्याड हल्ल्यानंतर सुरक्षा दल व जम्मू काश्मीर पोलिसांकडून घटनास्थळी व्यापक स्वरुपात शोधमोहीम सध्या सुरू आहे. जवानांवर हल्ला झाला त्या ठिकाणाहून काही अंतरावरच काल (९ नोव्हेंबर) ग्राम संरक्षण दलातील दोन जवानांचे मृतदेह आढळून आले होते. ग्राम संरक्षण दलातील नाझिर अहमद व कुलदीप कुमार या दोन जवानांचे दहशतवाद्यांनी अपहरण केले होते. त्यानंतर दोघांची हत्या केली. जैश-ए-मोहम्मदचा गट काश्मीर टायगर्सने या हत्येची जबाबदारी स्वीकारली आहे.

# आंबेडकरी राजकारणाचे संदर्भ आणि वस्तुस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अखिल भारतीय आंबेडकरी राजकारण, पूर्णतः भारतीय राजकारणात दिवसेंदिवस प्रभावहीन होत आहे. त्याची कारणे अनेक आहे. विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निर्वाणानंतर अल्पशी काही वर्ष सोडली व उत्तर भारतातील मान्यवर कांशीराम यांच्या माध्यमातून सत्तेपर्यंत गेलेले आंबेडकरी राजकारण, रिपब्लिकन पक्षाचा अत्यल्प सुवर्णकाळ हे अपवाद सोडले तर भरीव असे राजकीय स्वरुपाचे कार्य अद्याप यशस्वी झालेले नाही. ही गत ऐतिहासिक स्थिती आहे. आंबेडकरी राजकारणाचा हा परिप्रेक्ष्य, आंबेडकरी राजकारणाचा महत्वपूर्ण विशेष काय असेल, अलौकिकत्व काय असेल? तर ते मूलभूत तत्व आहे, विचार आहे, शीर्षस्थान असेल तर ते आहेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर ! ही खरी शक्ती आहे ही अविरत संचालित होणारी उर्जा आहे. आंबेडकरी राजकारणाचाच नव्हे तर भारतीय राजकारणाचा मध्यबिंदू डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. बाबासाहेबांना बायकॉट करुन देशात कोणतेही राजकारण उभं राहू शकत नाही. सत्ता स्थानापर्यंत पोहचू शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पक्षाचे भारतातील मोठे नेते प्रो. एन. शिवराज (रिपाईचे पहिले राष्ट्रीय अध्यक्ष) म्हणाले होते डॉ. आंबेडकर डेड इज स्ट्रॉन्गर दॅन आंबेडकर अलिव्ह केंद्रीय सत्ता उजव्या विचारसरणीच्या हिंदूत्ववादी शक्तिंच्या हाती गेली असली तरी त्यांना बाबासाहेबांना नाकारता आलेले नाही. त्यांनी त्यांच्या बाजूने तसे प्रयत्न केले. वेळप्रसंगी ते गांधीला डावलतील कारण त्या विचाराची एक प्रबळ शक्ती सामर्थ्याने राजकारणात स्थीर आहे. भारतीय राज्यघटनेच्या धर्मनिरपेक्ष तत्त्वाची त्या राजकीय शक्तीला पाठबळ आहे. सेक्युलर म्हणून (कॉंग्रेस) या पक्षाची ओळख आहे. जो पक्ष हिंदूत्व, राष्ट्रवाद, पुरातनता अशी एक दुसरी ओळख (भाजपा) आहे. जो पक्ष उठता-बसता बाबासाहेबांची पूजा करीत आहे. लोकशाही, संविधानाचा गवगवा

करीत आहे. कारण त्यांना सत्तेसाठी सर्व काही अर्पण आहे. अलीकडे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस तथा समविचारी पक्ष यांनीही संविधान हा मुद्दा पुढे करून लोकसभेच्या गत निवडणूकीत मेंबर ऑफ पार्लमेंट (खासदार) निवडून आणले. प्रश्न येतो आम्ही कुठे आहोत? कुठे आहे आंबेडकरी राजकारण, त्या राजकारणाची दिशा काय? पक्ष, नेता, झेंडा आणि अजेंडा कुठयं? पुरोगामी, प्रतिगामी, समाजवादी इत्यादी स्वतंत्र राजकीय शक्ती अपरिहार्यतेने डॉ. बाबासाहेबांपुढे लीन आहे. विनम्रपणे ते बाबासाहेबांना आळवित आहेत. त्यांच्या नावावर राजकारण करून सत्तास्थान बळकावित आहेत. आपलं घोडं कुठं पेंड खातयं? आम्ही तर आंबेडकरी राजकारणाचं आदिस्थान आहोत. नैतिक, वैचारिक आणि पारंपरिक वारसदार आहोत? आम्ही कोणतं राजकारण करतो, आम्ही खरंच आंबेडकरी राजकीय भूमिका जतन केली आहे का ? आम्ही डॉ. बाबासाहेबांचा पक्ष, संघटना त्यांचे राजकीय अस्तित्व आम्ही बुडवायला निघालेले लोक किती कपाळकरंटे आहोत. कॉंग्रेस ह्या महाशक्तीला पर्याय म्हणून दिलेला बाबासाहेबांच्या स्वप्नातला, प्रतिज्ञेतला रिपब्लिकन पक्ष आम्ही चिंध्या-चिंध्या केला. राजकीय, आर्थिक आमिष दाखवून पक्ष फोडणे ही तर प्रस्थापित बड्या पक्षाची कुटनिती असते परंतु तत्कालीन आंबेडकरी नेते सावरले नाहीत. ते राजकीय उज्वल वैभव त्यांना सांभाळता आले नाही, 'रिपब्लिकन' ची किती शकलं उडाली. किती गट-तट, पक्षपातीपणा अरेरे फार वाईट अवस्था झालीय. कुण्या तोंडाने आम्ही आंबेडकरी राजकारणाचा भाग आहोत असे आम्ही सांगणार आहोत. शेवटच्या घटका मोजणाऱ्या रिपब्लिकनचा पाण्यावरचा बुडबुडा तेवढा शिल्लक राहिला आहे. (रामदास आठवले गट) हा पदनिष्ठेला मानणारा माणूस नामधारी आहे. तर दुसरीकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू श्रद्धेय अॅड. बाळासाहेब आंबेडकर यांचे राजकारण भल्या भल्यानं समजत नाही. 'भारिप' अर्थात भारतीय रिपब्लिकन पक्ष ज्या पक्षाला डॉ. बाबासाहेबांची पार्श्वभूमी आहे. तेजोवलय आहे. तो पक्ष पक्षपाती ठरवून हा स्वनिर्मित पक्ष स्थापन केला. या पक्षाची राजकीय भूमिका, ध्येयेधोरणे, कार्यक्रम हे कुणी ठरवले, कसे ठरवले हे



पक्षनेतृत्वाला माहित परंतु डॉ. बाबासाहेबांची पार्श्वभूमी असलेला रिपब्लिकन

१ (भारिप) विसर्जित करणे हे मात्र दुःखद आहे. महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाला पर्याय देऊ पाहणाऱ्या मान्यवर कांशीराम यांना ते जमलं नाही त्यांनी हे आंबेडकरी विचारांच पर्यायी रोपटं उत्तर भारतात लावलं. ते जपलं वाढवलं आणि सत्तेची वाट सुकर केली. कालकथित कांशीराम नंतर पक्षाच्या नेत्या मायावती यांनी पक्ष बुडीत काढला आहे. चारवेळा सरकार स्थापणाऱ्या मायावती 'ब्र' शब्द बोलायला तयार नाहीत. म्हणजेच उत्तर भारतातूनही आंबेडकरी राजकारणाचा अस्ताचा प्रवास सुरू झाला आहे. प्रा. कवाडे, सुलेखा कुंभारे, डॉ. राजेंद्र गवई या भूमिकाविहीन नेत्याविषयी काय बोलावे. कुणाच्याही खिशात जावून बसणारे हे लोक, यांच राजकीय अस्तित्व जवळजवळ संपुष्टात आलेलं आहे. सत्तेसाठी कुणाचेही जोड उचलणारे हे लोक आहेत. यांना जनाधार राहिलेला नाही हे प्रस्थापितांचे बगलबच्चे आहेत. मग प्रश्न पडतो आंबेडकरी राजकारण शेष आहे का ? असेल तर ते प्रमाण किती आहे ? त्या राजकारणाचं स्वरूप काय आहे? शुद्ध स्वरूपाचं, तात्विक आंबेडकरी राजकारण वर्तमानस्थितीत आहे काय ? जरा डोळसपणे स्वपरीक्षण करा, अंतर्मुख व्हा आणि हृदयावर हात ठेवून सांगा खरं काय ते डॉ. बाबासाहेबांनी मोठ्या सूचकतेने आम्हाला काही निर्देश दिले आहेत पण आम्हा पोटभरू समाजाला ते कळाले नाहीत. तुम्ही तुमच्या झोपड्या शाबूत ठेवा, दुस-यांच्या हवेल्यात शिरू नका, स्वाभिमान भारकरीपेक्षा महत्त्वाचा आहे ही बाबासाहेबांची विधानं काय सांगातात? आई वडिलांनी आपल्या पाल्यांवर संस्कार करावेत अगदी त्या प्रतीचे हे संस्कारक्षम जीवन आम्हाला त्यांनी दिले, जीवनाचं सोनं केलं. आम्ही त्यांना काय दिले त्यांनी निर्मिलेल्या पक्षसंघटना, संस्था चळवळीसाठी आमचं योगदान काय? हा व्यक्तिगत तितकाच सार्वजनिक प्रश्न आहे. कुठे आहे आमचा पक्ष आम्ही विकून खाऊन टाकला. डॉ. बाबासाहेबांसारखी राजकीय आकांक्षा, ध्येयवत्ता कुण्याचं पॉलिटीकल लीडरकडे नसेल, त्याग, संघर्ष आणि समाजासाठी समर्पित असलेली लीडरशीप अद्वितीय आहे. इंडिपेन्डट लेबर पार्टी, शेड्युल कॉस्ट ऑफ फेडरेशन आणि त्यांच्या प्रतिज्ञेतला 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' हा महामानव पूर्णतः राजकीय भूमीची मशागत करून गेला त्यांना पॉलिटिकल प्लॅटफॉर्म तयार करून दिला त्यांचे आम्ही वाळवंट केले. काही बिनलाजे म्हणतात त्या पक्षाची दलाली करणारे काहीजण म्हणतात आमच्यामुळे पक्षाचे नाव तरी शिल्लक राहिले. अशा उपटसुंभ स्वयंभू नेत्यांना सायबेरियात पाठविले पाहिजे. त्यांना अशीच शिक्षा झाली पाहिजे पण शिक्षा कोण करेल. भारतीय लोकशाही देशात स्टॅलिन सारख्या हुकूमशहा थोडीच आहे. करा मनमानी पण हे लक्षात ठेवा तुमचे दिवस भरत आले आहेत.

आंबेडकरी राजकारण्याच्या संबंधाने निपक्षपणे काही नोंदी, निरीक्षणे व आंबेडकरी राजकीय भूमिका तथा वस्तुस्थिती संक्षेपानं मांडावी हा मानस आहे. हे आपणास ज्ञात आहे. धर्मनिरपेक्ष (सेक्युलर) लोकशाही, समाजवादाला प्रमाणभूत मानून यथावकाश प्रयत्नवत आहेत. डावे पक्ष संघटना आहेत. आम्ही इतके विघटित आहोत इतके तुटलेले आहोत वर निर्देशित केलेले पक्ष आपणास केव्हा विचारात घेतील जेव्हा तुमी काही अंशी तरी राजकीय शक्ती बनेल किंवा बनलेली असेल तेव्हा अन्यथा आपणास ते ग्राह्य धरणार नाहीत आणि निवडणूकीत मतांचा फायदा त्यांनाच होईल किंवा आपल्यातील नेतृत्वाचे उसणे आवसान आणून चमकोगिरी करणारा नेता मते विशिष्ट बाजुला वळवून पोलरायझेशन करून नको त्या पक्षाला मदत करू शकतो (त्या नेत्याला कोट्यावधी रूपयांचे सहाय्य मिळोलेले असते) हे आपण अनुभवत आहोत. आंबेडकरी जनता हे जाणते.

पक्षासाठी पक्षनेतृत्वासाठी सत्ता किंवा सत्तेत सहभाग फार महत्त्वाचा असतो. तसे असले पाहिजे शेवटी राजकारण हे सत्तेसाठीच पण, तत्त्वे, विचार, निष्ठा, ध्येये, स्वाभिमान आणि विशेषतः जनतेच्या मन, मतांचा आदर हा पक्षनेतृत्वासाठी फार महत्त्वाचा असतो. सत्ता किंवा सत्तेत सहभाग इतका महत्त्वाचा नाही. सर्व काही सत्तेसाठी हा आंबेडकरी राजकीय परिप्रेक्ष्यातला भागच नाही. भारतीय संविधान, लोकशाही, निवडणूक आणि त्यातून घडणारे सत्तांतर हा परिवर्तनकारी, क्रांतदर्शी अशी सांसदीय भारतीय लोकशाही शासनप्रणालीतील अमूल्य ठेवन आहे. एक संविधानिक ढाचा आहे, रचना आहे. 'निवडणूका' म्हणजे लोकशाहीचा उत्सव समजल्या जातात हा उत्सव व्यवस्थित पार पाडावा म्हणून राज्यातील तथा केंद्रातील काही सहायक शासकीय यंत्रणा कार्यरत असतात.

**(क्रमशः)**

**डॉ. कोंडबा भगवान हाटकर**
एम.ए. (मराठी) एम.फिल., नेट, सेट, पीएच.डी पोस्ट डॉक्टरेट फेलो.
मो. नं. ९५५२१३३९५१
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद.)

# प्रसिध्द गायक अजय गोगावले यांनी घेतले श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे दर्शन



**पंढरपूर/प्रतिनिधी : प्रसिध्द गायक अजय गोगावले यांनी दिनांक ०९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे दर्शन घेतले. त्यावेळी त्यांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी यथोचित सन्मान केला. यावेळी मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार व कर्मचारी उपस्थित होते.**

# प्रस्थापित घराणेशाही हटाव;लोहा कंधार बचाव माजी सैनिक संघटनेचा नारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनीधी : प्रस्थापित घराणेशाहीला मुक्त करून या तालुक्याचा विकास करून राज्यात लोहा-कंधार मतदारसंघाची आणखी वेगळी ओळख निर्माण करण्याचा निर्धार केला आहे म्हणून माजी सैनिक संघटनेच्या वतीने मी उमेदवारी दाखल केली असे बालाजी चुकलवाड म्हणाले .

मागील तीन ते चार वर्षापासून मतदार संघात सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवून नावलौकिकास आलेली माजी सैनिक संघटना आगामी होणारी विधानसभा निवडणूक अपक्ष लढवीत आहे व त्यांची निशाणी अंगठी आहे.

गेल्या तीन-चार वर्षापासून माजी सैनिक संघटना लोहा-कंधार मतदार संघामध्ये सैनिकांचे प्रश्न सोडवत सामान्य जनतेचे पण प्रश्न सोडवण्याचा सातत्याने प्रयत्न करत आहे. तालुक्यामध्ये अत्यावश्यक लाईट, पाणी, रस्ते, शिक्षण, आरोग्य या बाबींवर कुठलाच विकास झालेला नसून एवढंच नव्हे तर ज्यांनी आजी-माजी खासदार आमदारांनी अनेक वर्षे सत्ता भोगली त्यांच्याच गावामध्ये जाण्यासाठी रस्ता नाही त्यांना शिक्षण देता आले नाही त्यांना आरोग्य देता आले नाही हे कंधार तालुक्याचे दुर्दैव . बालाजी चुकलवाड म्हणाले की, मी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला असून, लोहा कंधार मतदारसंघातील सुजाण मतदार देखील माझ्या सोबत मोठ्या संख्येने आहेत. आम्ही सातत्यानं जनतेसोबत उभे



असतो आणि मला खात्री आहे की जनताही आम्हाला साथ देतील. तसेच मी एक साधा कार्यकर्ता असून सर्वसामान्यांचं काम करण्यासाठीच लढतोय, असंही बालाजी चुकलवाड म्हणाले.

मागील चाळीस वर्षापासून कंधार लोहा मतदारसंघाला अंधारात ढकलणाऱ्या प्रस्थापिताना, तसेच मतदार संघातील भोळ्या भाबड्या जनतेला जातीजातीमध्ये धर्मामध्ये गुंतवून ठेवणाऱ्याला त्यांची जागा दाखवल्याशिवाय आपल्या मतदारसंघाचा विकास होणार नाही. त्यासाठी सुजान नागरिकांनी, तरुण मतदारांनी मला संधी द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आम आदमी पार्टीचा अनिल सावंत यांना जाहीर पाठिंबा

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळवेढा तालुक्यातील आम आदमी पक्षाचे मंगळवेढा तालुकाध्यक्ष मा श्री एकनाथ फाटे मंगळा जिल्हा उपाध्यक्ष व ज्ञानेश्वर बाबर जी. मुंगळा शहराध्यक्ष मा भारत शिंदे जी यांच्या नेतृत्वास आज मी पार्टी पक्षाचा वीर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून मला पाठिंबा दिला आहे अशी माहिती पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार अनिल सावंत यांनी दिली. आम आदमी पक्षाच्या नेत्यांवर भाजपने इडीशिवाय गैरवापर करून तुरुंगात टाकले संजय राऊत, अनिल देशमुख यासारख्या एकनिष्ठ आणि निष्पाप नेत्यांनाही जेलमध्ये टाकले उद्या भाजप सत्तेत राहिले तर तुमचे दुकान कधी बंद करायचे आणि



कधी चालू करायचे हे भाजपने ठरवतील त्यामुळे महाविकास आघाडी सत्तेत येणे फार आवश्यक असल्याचे सांगत आपण ही लढाई निश्चित जिंकू असा विश्वास तालुका अध्यक्ष एकनाथ फाटे साहेबांनी व्यक्त केली.

# भरारी पथकातील कर्मचारी यांनी निवडणूक कर्तव्यात कसूर केल्याने निलंबनासह गुन्हा दाखल करण्याची कठोर कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे यश सिद्धी न्यूज : उल्हासनगर, दि.१० नोव्हें. १४१-उल्हासनगर विधानसभा मतदार संघातील भरारी पथक क्र.३ व ६ मधील कर्मचारी श्री. संकेत चनपुर, लिपीक, उल्हासनगर मनपा, श्री. संदिप शिरसवाल, लिपीक, उल्हासनगर मनपा व श्री आण्णासाहेब बोरूडे, मुकादम, उल्हासनगर मनपा व या पथकामधील पोलीस कर्मचारी श्री. विश्वनाथ ठाकूर, पो.हवा आणि श्री. राजरत्न बुकटे, पो.ना यांचेवर कर्तव्यात कसूर केल्याने निवडणूक निर्णय अधिकारी यांचेद्वारे दि.०८/११/२०२४ रोजी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला. सदरची घटना दिनांक १८/१०/२०२४ रोजी घडल्यानंतर संबंधित व्यक्तिने पोलीस उप-आयुक्त यांच्याकडे दिनांक १९/१०/२०२४ रोजी तक्रार दाखल केली होती. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-४ यांनी याबाबत तपास करून व संबंधितांचे जाबजबाब घेऊन दिनांक २८/१०/२०२४ रोजी आयुक्त, उल्हासनगर मनपा व निवडणूक निर्णय अधिकारी यांना प्रथम अहवाल सादर केला होता. संबंधित कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसूर करून भ्रष्ट मार्गाचा अवलंब केला असल्याने निवडणूक निर्णय अधिकारी यांनी तात्काळ दिनांक ३१/१०/२०२४ रोजी संबंधित कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करणेसाठी संबंधित विभागांना अहवाल पाठविला होता. भविष्यात पुन्हा असा प्रकार होऊ नये यासाठी प्रशासकीय कारवाई सोबतच संबंधित कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची कठोर कारवाई निवडणूक निर्णय अधिकारी यांचेमार्फत करण्यात आलेली आहे. श्री. बबन आमले, रा.भांडूप (पश्चिम) हे दिनांक १८/१०/२०२४ रोजी पहाटे वा. सुमारास म्हारळ नाका, उल्हासनगर नं.१ या ठिकाणाहून त्यांचे मित्र नितीन शिंदे यांचेसह त्यांचे इटिंगा कार मधून अहमदनगर व पुणे जिल्हयातील फुल उत्पादक शेतकरी यांचे फुल विक्री करून त्यांचे मालाचे पैसे त्यांना घरपोच देण्यासाठी रोख स्वरूपात रक्कम रू.७,५०,०००/- घेऊन जात असताना भरारी पथकाचे प्रमुख श्री. संदिप शिरसवाल व श्री. संकेत चनपुर यांनी मिळून आलेल्या पैशाबाबत तुमच्यावर गुन्हा दाखल होईल. पैस जप्त करून ते परत मिळणार नाही अशी भिती घालून सदर रक्कमेपैकी रक्कम रू.८५,०००/- काढून घेतले होते. याबाबत पोलीस विभागाने तपास करून त्यांचा अहवाल निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर केला होता. संबंधितांवर प्रशासकीय कारवाई सुरू असताना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांना दिनांक ०८/११/२०२४ रोजी सदरची बाब समजल्यानंतर त्यांचेमार्फत तात्काळ गुन्हा दाखल करणेचे निर्देश देणेत आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी श्री. शर्मा यांनी संबंधित दोषी कर्मचा-यांवर दिनांक ०८/११/२०२४ रोजी रात्री गुन्हा दाखल केला आहे. तसेच, निवडणुक निर्णय अधिकारी यांनी सदर कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय शिस्तभंग विषयक कारवाई होणेकामी पाठविलेल्या अहवालाच्या आधारे आयुक्त, उल्हासनगर, मनपा व पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-४ यांनी संबंधित पाच ही कर्मचाऱ्यांना निलंबित करणेत आलेले आहे. भरारी पथक क्र. ३ व ६ मध्ये नविन कर्मचारी यांची नियुक्ती करणेत आलेली आहे. सर्व पथकांनी त्यांचे निवडणूकीचे काम योग्यरित्या व निःपक्षपाती करणेबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कडक निर्देश दिलेले आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या या कठोर कारवाईमुळे मतदारसंघातील सर्वच पथक सतर्क झाले आहेत.

# बार्टी संस्थेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिनी अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे /प्रतिनीधी : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे संस्थेच्या वतीने बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिन विविध उपक्रम द्वारे मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

७ नोव्हेंबर १९०० रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतापसिंह हायस्कूल ,सातारा येथील शाळेत पहिल्या वर्गात प्रवेश घेतला होता .

या ऐतिहासिक दिनी बार्टी संस्थेच्या निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार यांनी आज प्रतापसिंह हायस्कूल ला भेट देऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची सही असलेले रजिस्टर व दस्तवेज याची पाहणी करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन केले.

याप्रसंगी प्रकल्प व्यवस्थापक श्रीमती नसरिन तांबोळी, प्रकल्प अधिकारी श्री दिलीप वसावे, अमर सोनवणे , समतादुत हे उपस्थित होते.

बार्टी , पुणे मुख्यालयातील डॉ



बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विभाग प्रमुख श्रीमती वृषाली शिंदे, श्री रवींद्र कदम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

बार्टी संशोधक विद्यार्थी श्री योगेश मुरलीधर चितारे यांनी संशोधन करून राष्ट्रीय पातळीवर चार पेटेनट मिळवुन बार्टी संस्थेचे नाव उज्वल केल्याबद्दल त्यांचा सन्मान विभाग प्रमुख श्रीमती वृषाली शिंदे यांच्या हस्ते द प्रॉब्लेम व रुपी हा ग्रंथ व गुलाब पुष्प भेट देऊन करण्यात आला .

मनोगत व्यक्त करताना ग्रंथपाल श्रीमती वैशाली खांडेकर यांनी विद्यार्थ्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श समोर ठेवून अभ्यास करावा असे मत व्यक्त केले . सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक श्री नरेश गोटे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मिलिंद महाविद्यालय व सिद्धार्थ महाविद्यालयाची उभारणी करून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली . डॉ बाबासाहेब आंबेडकर हे जगातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थी असल्याचे सांगितले. प्रकल्प व्यवस्थापक श्री सुमेध थोरात यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाचे संविधान लिहून देशातील जनतेला संविधानिक हक्क मिळवून दिले . सामाजिक क्रांती केली डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने असलेल्या बार्टी संस्थेमध्ये आपण काम करतो आपण विद्यार्थ्यांना सहकार्य व मदत करावी असा आशावाद व्यक्त केला.

तिहास संशोधक डॉ संभाजी बिराजे यांनी विद्यार्थी दिनाचे पुष्प गुंफताना डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे बालपण , प्रतापसिंह हायस्कूल मधील घेतलेले शिक्षण, राजर्षी शाहू महाराज, लोकराजा सयाजीराव गायकवाड यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना उच्च शिक्षणासाठी केलेली आर्थिक मदत तसेच माणगाव परिषदेमधील राजर्षी शाहू महाराजांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल केलेले भाकीत डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाच्या संविधानाची निर्मिती करून पूर्ण केल्याचे सांगून अभ्यासपूर्ण मत व्यक्त केले .

लेखाधिकारी श्रीमती योगिता झानपुरे, सहाय्यक लेखाधिकारी श्री शिंदे, प्रकल्प व्यवस्थापक डॉ सारिका थोरात, शुभांगी सुतार, आरती जाधव यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन श्री रामदास लोखंडे यांनी केले. आभार डॉ अंकुश गायकवाड यांनी मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### जुना विडी घरकुल परिसरातून दुचाकी लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : जुना विडी घरकुल परिसराजवळ हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३. सीडी.३७१५ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ८ ते ९ नोव्हेंबर दरम्यान घडली.याप्रकरणी दत्तात्रय लोकप्पा केंदुळे (वय-५८,रा.जे १ ग्रुप,जुना विडी घरकुल) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार पाटील हे करीत आहेत.

### एसटीच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी

सोलापूर, (प्रतिनिधी) : एसटीच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना ९ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास संभाजी चौक येथे घडली. याप्रकरणी गौरव दत्तात्रय नरोटे (वय-५५,रा.अवंती नगर,जुना पुना नाका) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून शिवाजी जगन्नाथ गायकवाड (वय-५५,रा. विद्यानगर,कर्मवीर,कॉलनी सैदापूर, तालुका कराड,जिल्हा सातारा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत अधिक माहिती की, फिर्यादी हे त्यांची दुचाकी क्रमांक एमएच.१३.बीजे.७३७८ यावरून संभाजी चौक ते राहत्या घराकडे जात असताना हरीओम ऑटोमोबाईल समोर फिर्यादी यांच्या पाठीमागून येणारी एसटी बस क्रमांक एम एच.१४.बीटी.२८५७ यातील वरील संशयित आरोपी हा निष्काळजीपणाने व भरधाव वेगात बस चालवून फिर्यादी यांच्या दुचाकीला धडक देऊन त्याला गंभीर जखमी केले आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस नाईक भद्रशेट्टी हे करीत आहेत.

### मंदिराजवळ पार्क केलेली दुचाकी पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : दक्षिणमुखी हनुमान मंदिर येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.डीयू.८७६१ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ८ ते ९ नोव्हेंबर दरम्यान घडली.याप्रकरणी श्रीकांत राजू कोतवाल (वय-२१,रा.तुळशांती नगर,हनुमान मंदिर जवळ) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस नाईक गायकवाड हे करीत आहेत.

# कार्तिकी यात्रा : वारकरी, भाविकांसाठी १२०० स्वयंसेवकांची विना मोबदला सेवा

## कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कार्तिकी वारीच्या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, मंदिर परिसर व दर्शन रांगेत मंदिर समितीच्या वतीने आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यासाठी विविध सेवाभावी संस्थांचे सुमारे १२०० स्वयंसेवक विना मोबदला २४ सेवा देत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

वर्षभरात माघी, चैत्री, आषाढी व कार्तिकी अशा चार प्रमुख यात्रा पंढरपुरात मोठ्या प्रमाणात भरत असतात. या यात्रा कालावधीत मंदिर समितीकडे विविध स्वयंसेवी संस्थांचे स्वयंसेवक विना मोबदला सेवा देत असतात. त्यामध्ये कार्तिकी वारीत स्वकाम सेवा, आळंदी यांच्याकडील स्वयंसेवक स्वच्छता, श्री संत गजानन महाराज मठ अकोला यांच्याकडील स्वयंसेवक दर्शन रांगेत चहा व खिचडी वाटप तसेच वैष्णव चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई यांच्या मार्फत दर्शन रांगेत वैद्यकीय सेवा, विठ्ठल सेवा मंडळ पुणे यांच्याकडील स्वयंसेवक देणगी संकलन करण्याची सेवा देत आहेत.

तसेच गीताई सेवा मंडळ औसा यांच्याकडील महिला स्वयंसेविका मंदिर समितीच्या अन्नछत्रांमध्ये भोजन प्रसाद तयार करण्यासाठी मदत करीत आहेत. विश्व सामाजिक




सेवा भावी संस्था आळंदी व श्री संत ज्ञानेश्वर सेवा मंडळ आळंदी यांच्याकडील स्वयंसेवक दर्शन रांगेत स्वच्छता करणे, दर्शन रांग सुलभ चालविण्यासाठी मदत व दर्शन रांगेत पाणी वाटप करण्याची सेवा बजावत आहेत. संत मिराजी महाराज सेवेधारी मंडळ अकोला यांच्याकडील स्वयंसेवक पत्रा शेड येथे मागील वर्षापासून सुरू करण्यात आलेल्या अन्नछत्रांमध्ये भोजन प्रसाद तयार करून वाटप



करण्याचे काम करत आहेत.

**लौकिकापुरती नव्हे माझी सेवा ।**
**अनन्य केशवा दास तुझा ॥**

या श्री संत तुकाराम महाराजांच्या अभंगाप्रमाणे, विविध स्वयंसेवी संस्थांचे स्वयंसेवक सेवा देत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगितले. तसेच आठ सेवाभावी संस्थांचे स्वयंसेवक मंदिर समितीकडून कोणत्याही स्वरूपाचा मोबदला न घेता, सेवाभावी वृत्तीने विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची अनेक वर्षापासून यात्रा कालावधीत सेवा देत आहेत. या सर्व स्वयंसेवकांना मंदिर समिती मार्फत निवास व भोजन व्यवस्था करण्यात आल्याचेही श्री.श्रोत्री यांनी सांगितले.

### अज्ञात चोरट्याने लॅपटॉपसह कागदपत्र चोरले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (प्रतिनिधी) : तरुणाचे व त्याच्या मित्राचे कागदपत्रे, लॅपटॉप, दुचाकी व चार चाकीचे लायसन असा एकूण १ लाख १२ हजार रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने तरुण चोरून नेल्याची फिर्याद शुभम नंदकुमार गाडे (वय-२२,रा.वासुदेव गल्ली,कोर्टाच्या मागे,तुळजापूर) याने जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्याच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना ८ नोव्हेंबर रोजी अशोक चौक येथे घडली. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनवणे हे करीत आहेत.

# कार्तिक यात्रा : पत्राशेड येथे मंदिर समिती मार्फत अन्नछत्र



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कार्तिकी एकादशी मंगळवार, दिनांक १२ नोव्हेंबर रोजी आहे. या यात्रेला येणाऱ्या भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा मंदिर समितीच्या मार्फत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यामध्ये मंदिर समिती मार्फत पत्राशेड येथे मागील वर्षीप्रमाणे मोफत अन्नछत्र सुरू करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

त्याचा शुभारंभ दिनांक १० नोव्हेंबर रोजी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व लेखाधिकारी मुकेश अनेचा यांच्या हस्ते व विभाग प्रमुख भीमाशंकर सारवाडकर, राजेश पिटले, अतुल बक्षी, शंकर मदने, राजाराम ढगे, राजेंद्र घागरे यांच्या उपस्थितीत पार पडला. या अन्नछत्राची जबाबदारी विभाग प्रमुख बलभीम पावले व सहायक विभाग प्रमुख दत्तात्रेय इंगळे यांना देण्यात आली असून, प्रसाद वाटपासाठी श्री. संत मिराजी महाराज पुरूष व महिला सेवेधारी मंडळ, अकोला या स्वयंसेवी संस्थेच्या २०० स्वयंसेवकांची मदत घेण्यात येत आहे. दर्शन रांगेतील कोणताही भाविक उपाशी पोटी विठुरायाच्या दर्शनास जाऊ नये, यासाठी कार्तिकी यात्रेत मागील वर्षीपासून पत्राशेड येथे अन्नछत्र सुरू करण्याचा मंदिर समितीने उपक्रम सुरू केला आहे.

दर्शनरांगेत भाविकांची मोठी गर्दी असून, हजारो भाविक उभे आहेत, ही दर्शनरांग गोपाळपूर पर्यंत करण्यात आली आहे. दर्शन रांग जलद व द्रुतगतीने चालविण्यासाठी व घुसखोरी रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्याने दर्शन रांग द्रुतगतीने चालून भाविकांचे जलद व सुलभ दर्शन होत असून, दैनंदिन सुमारे ३० ते ३५ हजार भाविकांना पदस्पर्श दर्शन घडत आहे. संपूर्ण दर्शन रांगेवर ऊन, वारा, पावसापासून संरक्षणासाठी आच्छादन, पिण्यास मि

**कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची माहिती**

नरल वॉटर -चहा, स्पिकरवर अभंग आणि भक्तीगीते, स्वच्छतागृह, सतर्क सुरक्षा यंत्रणा, सार्वजनिक सूचना प्रणाली, आपत्कालीन व्यवस्थापन, पायाला खडे टोचू नये म्हणून म्याटिंग, कुलर - फॅन, विश्रांती कक्ष, हिरकणी कक्ष, लाईव्ह दर्शन, सूचना फलक, सॅनिटरी नॅपकिन, आपत्कालिन मदत कक्ष व आरोग्य सुविधा उपलब्ध असून दर्शनरांगेत पुंडलिक वरदा, हरी विठ्ठल.. असा जयघोष सुरू आहे.

आषाढी यात्रेत बागलकोट जिल्ह्यातील बंडीगणीमठ येथील चक्रवर्ती दानेश्वर महाराज या विठ्ठल भक्ताने अन्नदान केले होते. त्याच धर्तीवर कार्तिकी यात्रेत दर्शन रांगेत असलेल्या प्रत्येक भाविकाला पोटभर खाऊ घालून दर्शनासाठी पाठविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच दर्शन रांगेतील भाविकांना पुरेशा व मुबलक प्रमाणात अत्याधुनिक सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न असून, सदरची यात्रा आनंददायी व निविघ्नपणे पार पाडण्यासाठी मंदिर समितीचे सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग व स्वयंसेवक अहोरात्र मेहनत घेत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगीतले.

# अक्कलकोट विधानसभेचे दुसरे प्रशिक्षण टप्पा पूर्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील विधानसभा निवडणुकीसाठी राबवल्या जाणाऱ्या मतदानाची संपूर्ण कामकाज इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणा द्वारे होणार आहे या निवडणुकीत एम-३ बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व व्हीव्हीपॅट मशीनचा वापर होणार आहे.

यासाठी विविध तालुक्यातून आलेले केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी असे एकूण १८१० अधिकारी दुसरे प्रशिक्षण पूर्ण केले. या प्रशिक्षणात निवडणुकीतील नवीन कायदे तरतुदी व अद्यावत सूचनांची माहिती , पोस्टल मतदान व निवडणूक कार्य प्रमाणपत्र , मशीन सिलिंग व व्हीव्हीपॅटची डूज अँड डोन्टस, प्रशिक्षण दरम्यान,संकलन केंद्र, मतदान पूर्व, मतदान दरम्यान, मतदान समाप्तीवेळी या प्रशिक्षणासाठी निवडणूक निर्णय अधिकारी सुशांत बनसोडे, सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा तहसिलदार विनायक मगर शंकर कविकत्ते नायब तहसिलदार विकास पवार विजयकुमार गायकवाड संजय भंडारे मास्टर ट्रेनर परमेश्वर व्हसुरे सिद्धेश्वर पारगोंडे बसवराज गुरव इतर सर्व कर्मचारी यांनी प्रशिक्षणसाठी परिश्रम घेतले पाहिले.



# महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार दिलीप धोत्रे यांच्या प्रचार सभेला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभेची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार दिलीप बापू धोत्रे यांच्या प्रचारांना मंगळवेढा तालुक्यातील विविध ठिकाणी उत्पन्न प्रतिसाद मिळताना दिसत आहे ठिकठिकाणी त्यांचे स्वागत मोठ्या प्रमाणात होत आहे.

मंगळवेढा तालुक्यातील देगाव, मल्लेवाडी, रेडी वाडी, मारापुर, पडळकरवाडी, लोणारवाडी, ममदाबाद, शिवरनंद, या भागामध्ये मनसेच्या वतीने सभा घेण्यात आली व त्यावेळेस गावातील लोकांनी उत्स्फूर्तपणे सत्कार करण्यात आला व त्यांना मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देण्यात आला.



मराठी नवनिर्माण सेनेचे महाराष्ट्रातील पहिली उमेदवारी पंढरपूर तालुक्यांमध्ये दिलीप बापू धोत्रे यांना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी जाहीर केली

यानंतर त्यांनी मतदारसंघांमध्ये मोठ्या प्रमाणात कार्यक्रम कार्यक्रम घेऊन शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचे काम त्यांनी केलेले आहे.

निवडणूक प्रचाराला सुरुवात झाल्यानंतर मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची मंगळवेढा मध्ये सभा घेऊन प्रचारामध्ये आघाडी घेतली आहे त्यांनी पंढरपूर मंगळवेढा येथील सर्व नागरिकांना देव देवतांसाठी दर्शनासाठी त्यांना घेऊन गेले व त्याचबरोबर मुस्लिम समाजांना अजमेर येते घेऊन त्यांना दर्शन घडवून आणले अशाप्रकारे त्यांनी कामे करीत व गोरगरिबांच्या कायम अडचणी सोडवण्याचे काम त्यांनी पंढरपूर मंगळवेढा विधानसभेमध्ये केलेले आहे त्यामुळे त्यांची पंढरपूर मंगळवेढा मध्ये अतिशय मोठ्या प्रमाणात त्यांना प्रचारामध्ये आघाडी मिळत आहे त्यांनी कायमस्वरूपाचे आणि अडचणीत असलेल्या लोकांना मदत करण्याची त्यांची असल्यामुळे त्यांना पंढरपूर मंगळवारी मधून निवडून येण्याचा त्यांनी आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

**तुळशी येथे जाहीर सभा; तुळशीत एक वर्षाच्या आत पाणी आणू आणि तालुक्यातील सर्व रस्ते दोन वर्षात पक्के करू**

**माढा तालुक्यातून अभिजीत पाटील यांना वाढता पाठिंबा**

# माढ्यासह राज्यात परिवर्तन अटळ : अभिजीत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : तीस वर्षे आमदारकी असतानाही तुळशी सारख्या गावात आजही पिण्याचे पाणी नाही,येथील मुलांची लग्ने जमत नाहीत. त्यामुळे पुढील एक वर्षाच्या आत तुळशीला पाणी तर आणुच पण दोन वर्षात मतदारसंघातील सर्व रस्ते पक्के करू, असे आश्वासन महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजीत पाटील यांनी दिले.

तुळशी (ता.माढा) येथे आयोजीत प्रचार सभेप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष्याचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील, हभप मधुकर नाईकनवरे, भारत पाटील, विजय भगत, सूरज देशमुख, दादासाहेब नाईक, शिवाजी मोरे, नागेश दगडे, बापूसाहेब दगडे, नारायण माळी, विशाल व्हनमाने, नामदेव खांडेकर, मोहित मोरे, मनोज शहा, बापूसाहेब गव्हाणे, विनायक वसेकर, संदीप कुलकर्णी, प्रमोद गव्हाणे, आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी श्री.पाटील यांनी स्वतःच्या कामाचा अनुभव सांगताना बंद पडलेला विठ्ठल सहकारी साखर कारखाना ताब्यात घेऊन चालू करून दाखवला. एवढेच नाही तर शेतकऱ्यांच्या उसाला जादा दर देण्यास सर्वांना भाग पाडले. त्यातून एकाच हंगामात तब्बल साडेआठशे कोटी रुपये ज्यादा शेतकऱ्यांना मिळवून दिले. हे आपण शेतकऱ्यांचे दुःख जाणत असल्याने करू शकलो, असे सांगितले. आजपर्यंत जे-जे बोललो ते खरे करून दाखवले आहे. विरोधकांनी मात्र आधी शरद पवार साहेबांना धोका दिला आणि आता ऐन निवडणुकीत अजित दादांना धोका दिला आहे. त्यामुळे विकासकामांसाठी एकदा संधी द्या आणि 'आमदाराच्या पोरालाच पुन्हा आमदार करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या पोराला आमदार करा' असे आवाहन त्यांनी केले.

सलग तीस वर्षे आमदारकी ताब्यात असतानाही यावेळी पक्षाने तिकीट का दिले नाही याचा विरोधकांनी आणि मतदारांनी विचार करावा असे सांगून आपल्याला शरद पवार साहेबांनी तिकीट दिले, आता जनता आमदार करणार असा विश्वास अभिजीत पाटील यांनी यावेळी व्यक्त केला. परिवर्तनासाठी शरद पवार साहेब आख्खा महाराष्ट्र पिंजून काढत आहेत.

महायुतीचे शासन राज्यात आणि केंद्रात सत्तेत असतानाही आरक्षणाचा प्रश्न जाणून बुजून चिघळत ठेवल्याचे श्री.पाटील म्हणाले. महाविकास आघाडीच्या सरकारने मात्र सत्तेत येताच जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला असून सर्व जातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात न्याय देण्याची भूमिका असल्याचे ते म्हणाले.

**माढा तालुक्यातून वाढता पाठिंबा**

जयंत पाटील यांच्या सभेप्रसंगी माढा तालुक्यातील अनेक गावांमधील स्थानिक नेत्यांनी अभिजीत पाटील यांना जाहीर पाठिंबा दिला होता. आजही टेंभुर्णी येथे विधानसभा निवडणूकीच्या अनुषंघाने अमर पाटील यांच्या उपस्थितीत ऋषिकेश (बंटीनाना) बोबडे यांनी बैठक बोलावलेली होती. त्या बैठकीमध्ये सर्वांची मते जाणून घेऊन येत्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गटाचे उमेदवार अभिजीत (आबा) पाटील यांना सर्वांनी एकमुखी पाठिंबा जाहीर केला. त्यावेळी माजी सरपंच प्रमोदजी कुटे, ऋषिकेश बंटीनाना बोबडे, डॉ.राहुल पाटील ,डॉ.सोमनाथ साळुंखे, संजय देशमुख, विनोद देशमुख, सचिन देशमुख,आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



**थोडक्यात...**

### शिवसेना शिंदे गट महिला आघाडी जिल्हा उपप्रमुख पदी सुलोचना कडबगावकर



अक्कलकोट : सोलापूर जिल्हा शिवसेना महिला आघाडी प्रमुख सौ.रविना राठोड यांनी सोलापूर जिल्ह्यात शिवसेना महिला आघाडी सक्षम बनविण्यासाठी नविन पदाधिकारी यांची नियुक्ती केली.जिल्हा उपप्रमुख महिला आघाडी पदी सौ.सुलोचना कडबगावकर.जिल्हा संघटीका पदी सौ सुनंदा बडुरे अक्कलकोट व दक्षिण सोला-पूर तालुक्यात महिला आघाडी बळकट करण्यासाठी यांची नियुक्ती केली असून लवकरच महिला आघाडी महामेळावा घेण्यात येणार आहे असे जिल्हा महिला आघाडी प्रमुख सौ रविना राठोड सांगितले

# अभिजीत पाटलांचे बळ वाढले तर शिंदेंना धक्का

## संजय कोकाटे व भारत शिंदे यांचा अभिजीत पाटील यांना पाठिंबा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : संपूर्ण राज्यभराम ध्ये विधानसभा निवडणुकांचा धुरळा उडलेला असताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तुतारी चिन्हाला मोठी पसंती असल्याचे पाहायला मिळत आहे. माढा मतदारसंघातही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तुतारी या चिन्हाला मतदारांची मोठी पसंती असून या चिन्हावर निवडणूक लढवणाऱ्या विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत पाटील यांना रोज अनेक दिग्गज नेत्यांकडून पाठिंबा दिला जात आहे. तसेच त्यांच्या सभांनाही म ोठ्या प्रमाणात लोकांचा प्रतिसाद मिळत आहे. माढा मतदारसंघांमध्ये अभिजीत पाटील यांनी प्रचारामध्ये मोठ्या प्रमाणात आघाडी घेतली असून बबनराव शिंदे यांच्या यांचे पुत्र श्री रणजीत शिंदे यांना प्रचारात पिछाडीवर सोडले आहे. अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित अरण येथील सभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते संजय कोकाटे व सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य भारत शिंदे यांनी अभिजीत पाटील यांना पाठिंबा जाहीर केला आहे. संजय कोकाटे यांनी गत पंचवार्षिक निवडणुकी बबनराव शिंदे यांचे प्रमुख विरोधक म्हणून त्यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती.

गेल्या आठ दिवसांपासून अभिजीत पाटील यांना अनेक गटांचा पाठिंबा मि ळाला असल्याचे दिसत आहे. निवडणुकांम ध्ये आमदार बबनराव शिंदे यांना सहकार्य करणाऱ्या अनेक जणांनी यंदा परिवर्तनाचा निर्धार करत अभिजीत पाटील यांना पाठिंबा दिल्याने आमदार बबनराव शिंदे यांच्या गटाच्या अडचणी वाढल्या आहेत. अशा-तच तसेच शेवट पर्यंत प्रयत्न करूनही तुत-ारी चिन्ह न मिळाल्याने अपक्ष लढण्याची नामुष्की ओढावलेल्या पुत्र रणजीत शिंदे यांच्यासाठी हा फार मोठा धक्का मानला जात असून यामुळे अभिजीत पाटील यांचा विजय सोपा मानला जात आहे.

यावेळी उपस्थित भारतनाना पाटील, संजय बाबा कोकाटे, भारत आबा शिंदे, बाळासाहेब पाटील, राजाभाऊ गायकवाड, अनिल पाटील, मधुकर अण्णा देशमुख, बाबूतात्या सुर्वे, रामकाका म्हस्के, पोपट तात्या अनपट, रावसाहेब नाना देशमुख, बाळासाहेबतात्या ढवळे, बलभीम आप्पा लोंढे, अमोल पाटील, प्रशांत पाटील, रंधवे सर, संजय मस्के, विलास बाप्पा देशमुख, गोविंदभाई देशमुख, ऋषिकेश



बोबडे, जगदाळे दीपक आबा देशमुख, आनंद कानडे, भगत सर, विजय पवार, बेंबळे गावचे सरपंच सौदागर जाधव यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## केशोरी येथील दिव्यांग मतदार देवराम उईके याने गृह मतदान प्रक्रिये दरम्यान बजावला मतदानाचा हक्क



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बोंडगांव देवी: सार्वत्रिक विधानसभा निवडणूकीसाठी ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदारांच्या मतदानाला सुरुवात झाली असुन अनेक मतदारसंघात ही मतदान प्रक्रिया पार पडली आहे.सध्या राज्यात सर्व पक्षांकडून जोरदार प्रचार सुरु आहे. अजून प्रचाराचे ८ दिवस शिल्लक आहेत.महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीसाठी येत्या २० नोव्हेंबर २०२४ मतदान पार पडणार आहे.या विधानसभा निवडणुकीमध्ये मतद-ानाचा टक्का वाढावा व मतदानापा-सून कोणीही नागरिक वंचित राहू नये यासाठी लोकसभा २०२४ निवडणुकी प्रमाणेच विधानसभा निवडणुकीतही ८५ वर्षांवरील नागरिक आणि दिव्यांग नागरिक जे मतदान केंद्रापर्यत पोहचू शकत नाही अशा मतदारांसाठी घरुनच मतदान करण्याची सोय भारत निवडणुक आयोग यांच्या वती-ने उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यासंबंधी गोंदिया जिल्ह्यातील ६३ अर्जुनी/मोरगाव विधानसभा मतदारसंघातून गृहमतदानासाठी दि.९ नोव्हेंबर २०२४ रोजी शनिवार ला केशोरी येथील दिव्यांग मतदार देवराम कृष्णा उईके याने गृहमतदान प्रक्रिया दरम्यान आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.विशेष म्हणजे दिव्यांग मतदार देवराम कृष्णा उईके यांच्या आईचे देहांत होऊन घरी आईचे मृतदेह असतांनी शुद्धा स्वयमवृत्तीने मतद-ानाचा अधिकार बजावुन देवराम याने एक आदर्श निर्माण केला आहे.

तर मतदान आपला हक्क असुन नागरिकांना मतदान करण्याचे आव-ाहन देवराम याने केले आहे.

यावेळी सुक्ष्म निरीक्षक आकाश तेलंग,झोनल अधिकारी संजु शाहारे,म तदान अधिकारी तथा मंडळ अधिकारी पुंडलिक कुंभरे,मतदान सहायक तथा तलाठी नावेद शेख,पोलीस शिपाई राहुल चिचमलकर यांनी गृह मतदान प्रक्रिया पार पाडली.

## माढा विधानसभा मतदारसंघांमध्ये अपक्ष उमेदवार रणजीत शिंदे यांना प्रा. शिवाजी सावंत यांनी दिला पाठिंबा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

माढा विधानसभा मतदारसंघांमध्ये गेली तीस वर्ष शिंदे आणि सावंत यांचे वर विसरून सावंत शिंदे परिवार माढ्यामध्ये एकत्र येऊन माढा मध्ये काम करण्याची ठरविले आहे.

माढ्यामध्ये अनेक वर्ष सावंत व शिंदे यांचे कोणताही दुरावा नव्हता व राजकीय मतभेद होते

माढा मतदारसंघांम ध्ये अनेक तीस वर्ष आमदारकी भौगोलिक बबनदादा शिंदे यांनी सावंत आणि शिंदे यांचे कोणत्याही प्रकारची वैर नव्हते फक्त राजकीय मतभेद असल्यामुळे आम्ही विभागतो. प्राध्यापक शिव-ाजी सावंत यांच्या पाठिंबामुळे विजय आमचाच आहे असे निश्चित आहे असे बबनदादा शिंदे यांनी बोलताना सांगितले





प्रा. शिवाजी सावंत यांनी आम च्या कार्यकर्त्यामध्ये तीन मीटिंग घेतल्या सर्व जनतेचा कौल म ान्य करून आम्ही हा सर्वांच्या मते हा निर्णय आम्ही घेतलेला आहे आमचे मतभेद विसरून आम्ही एकत्र आलो आहे. आम्ही माढ्यातील अपक्ष उमेदवार रणजीत शिंदे यांना पूर्व ताकतीने आम्ही पाठिंबा दिलेला आहे

वाड्यामध्ये बाहेर व्यक्तीने येऊन आपल्या माढ्यामध्ये वर्चस्व करू नये यासाठी आम्ही दोघे एकत्र आलो आहे.

या पुढील काळात आम्ही दोघे माढ्यातील सर्वांगीण विकास करण्यासाठी एकत्र आलो आहे व आमचे मतभेद नव्हते राजकीय मतभेद होते त्यापुढे तीस वर्षे वैर विसरून आम्ही एकत्र आलो आहे येऊन पुढील राजकारण सावंत व शिंदे दोन्ही कुटुंबाने एकत्र येऊन काम करावयाचे आहे असे ठरवले आहे प्राध्यापक शिवांजी सावंत यांनी सांगितले आहे

## श्री माणकेश्वर वाचनालयाची १०५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

निफाड शहर व परिसराची वाचन संस्कृती जोपासणारे आणि अनेक पिढ्यांची सांस्कृतिक आणि वैचारिक जडण घडण करणारे तसेच केंद्र सरकारचा राजाराम मोहन रॉय पुरस्कार प्राप्त श्री माणकेश्वर वाचनालयाची १०५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा वाचनालयाच्या सभागृहात मधुकरराव शेलार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली,




यावेळी न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे व वाचनालयाच्या संस्थापकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमापूजन अध्यक्ष मधुकरराव शेलार, दत्ताकाका उगावकर आदींसह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले,


यावेळी वाचनालयाच्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ट वाचक पुरस्कार संजय घुमरे यांना ट्रॉपी, शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ देऊन देण्यात आला,तसेच सभासद ऍड प्रभाकर खैरे यांनी वाचनालयास पुस्तक भेट दिले.

सभेत वार्षिक अहवाल-ास मंजुरी,ताळेबंद व नफा तोटा पत्रक,ऑडिट मेमो व अंदाज पत्रक,ऑडिटर नेमणूक व ऐन-वेळाचे विषयांचे वाचन चिटणीस बाळासाहेब कापसे यांनी केले आणि सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. यावेळी सभासदांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे अध्यक्ष मधुकरराव शेलार यांनी दिली. याप्रसंगी निफाड सोसायटीचे चेअरमन शिवाजी ढेपले, रघुनाथ कुंदे, संजय कुंदे, स्वप्नील बिनायकीया, डॉ शरद निफाडकर,नूर शेख, विजय धारराव, बाळासाहेब खालकर, माणिक देसाई, सुनील श्रीवास्तव, शाम गोळे, सुनील सोनवणे, संजय घुमरे, ऍड बाळासाहेब जंगम, प्रवीण तनपुरे, प्रभाकर भंडारे, किरण कुंदे, डॉ प्रतीक बाफना, दीपक जाजू, ऍड प्रमोद आहेर,गोपाल उपाध्ये, म धुकर उगले,शरद काकूळते,तुषार खालकर, संदीप अभंग आदींसह वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार, उपाध्यक्षा मेघा जंगम, चिटणीस बाळासाहेब कापसे, सहचिटणीस राहूल दवते, हिशोब तपासणीस दत्ताकाका उगांवकर, संचालक ऍड प्रवीण ठाकरे, तन्वीर राजे, नईमखान पठाण,नीलकंठ कुंदे, बाळासाहेब कर्डिले, सुजाता तनपूरे,राजेंद्र खालकर, सुनिल चिखले ग्रंथापाल प्र.नितीन बनसोडे,विद्या बंद्रे, नंदकुमार पुंड, अनिता इस्ते आदी उपस्थित होते.सभेचे प्रास्तविक अध्यक्ष मधुकरराव शेलार, सूत्रसंचालन संचालक तन्वीर राजे तर आभार राहुल दवते यांनी मानले.

## जनतेचा कौल विकासाला; सचिन दादा होणार पुन्हा आमदार!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट (प्रतिनीधी) : एकतर्फी असणारी अक्कलकोट मतदार संघातील निवडणूक माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांना आपल्या गोठ्यात घेऊन निवडणुकीत चुरस निर्माण करण्याचा केविलवाणा प्रयत्न सिद्धाराम म्हेत्रे करत आहेत.



सचिन कल्याणशेट्टी यांच्यामुळे सिद्रामप्पा पाटील यांचे राजकारणातील अस्तित्व मागील पाच वर्षात थोडे तरी टिकून होते. सिद्रामप्पा पाटलांना आपल्या आणि आपल्या मुलांचे, नातवंडांचे राजकीय भविष्य चांगल्या प्रकारे म ाहीत असल्यामुळे, निवडणुकीची संधी साधून आपल्या मुलांनातवंडांचे भविष्यातील शिदोरी गोळा करण्यासाठी काँग्रेस उमेदवार सिद्धाराम म्हेत्रे यांच्याबरोबर जाण्याची वेळ आली आहे.

राजकीय दृष्ट्या सक्रिय नसलेल्या सिद्रामप्पा पाटलांना सोबत घेऊन आपला गमावून बसलेला जनाधार थोडा तरी वाढवता येईल याचा केविलवाणा प्रयत्न म्हेत्रे यांनी केला.परंतु तरुण तडफदार व मागील पाच वर्षात केलेल्या विकास काम ांच्या जोरावर सचिन कल्याणशेट्टी हे मागील निवडणुकीपेक्षा जास्त मताधिक्याने निवडून येतील असे सामान्य जनतेचे, मतदारांचे मत आहे. त्यामुळे आता सचिन दादा पुन्हा किती मताने विजयी होणार याकडे तालुक्याची लक्ष लागले आहे.

**मतदारांमध्ये हर्षवर्धन पाटील यांच्या विषयी आपुलकीची भावना!** **बिजवडी परिसरात झंजावती दौरा**

# पवार साहेबांशी गद्दारी करणाऱ्या इंदापूरच्या आमदारांना जागा दाखवून द्या : हर्षवर्धन पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूरचे विद्यम ान लोकप्रतिनिधी हे आजपर्यंत पवार साहेबांच्या आशीर्वादावर विधानसभेला निवडून येत होते. त्यांना शरदचंद्रजी पवार साहेबांनी भरभरून दिले. तरीही पवार साहेबांशी अडचणीच्या काळात गद्दारी करणाऱ्या इंदापूरच्या आमदारांना विधानसभा निवडणुकीत मतदारांनी त्यांची जागा दाखवून द्यावी व पवार साहेबांना साथ द्यावी, असे आवाहन इंदापूर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार पक्षाचे व महाविकास आघाडीचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांनी केले आहे.

हर्षवर्धन पाटील यांनी रविवारी (दि.१०) बिजवडी, वनगळी, राजवडी, गागरगाव, पोंदकुलवाडी या गावांमध्ये झंझावती प्रचार दौरा केला. या दौऱ्यात पोंदकुलवाडी (ता. इंदापूर) येथे हर्षवर्धन पाटील यांचे जोरदार भाषण झाले. हर्षवर्धन पाटील यांच्या दौऱ्यास जनतेचा उत्स्फ ूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यकर्त्यांमध्ये वेगळा जोश निर्माण करण्यात हर्षवर्धन पाटील यशस्वी झाल्याचे चित्र दौऱ्यात दिसून आले. विशेष म्हणजे राज्यातील सुसंस्कृत नेते असलेले हर्षवर्धन पाटील यांचे विषयी जनतेमध्ये आपुलकीची भावना निर्माण झाली आहे.

### आमचे पाहुणे गेले ते चांगले झाले : छगन भोंगळे

**आमचे दोन पाहुणे असलेले पदाधिकारी आपलेतून गेले ते अतिशय चांगले झाले. ते सावली सारखे भाऊंबरोबर सतत असायचे. आंम्हाला ते भाऊंच्या जवळ येऊन देत नव्हते, कारण त्यांना वाटायचे आम्ही जवळ गेल्यास, त्यांची भाऊंजवळ किंमत कमी होईल. आता आम्ही ते गेल्याची कसर भरून काढू, आता लढाऊ मावळे राहिले आहेत, शब्द व वचन पाळणारे मावळे आहेत, असे कर्मयोगी कारखान्याचे संचालक छगन भोंगळे यांनी नमूद करतात टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.**

हर्षवर्धन पाटील पुढे म्हणाले, इंदापूरच्या विद्यमान आमदारांना शरद पवारांनी आजपर्यंत २५ वर्षात भरभरून पदे दिली. सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पवार साहेबांनी इंदापूरला सांगता सभा घ्यावी, म्हणून प्रचंड आग्रह केला, सदरच्या सभेमुळेच विजय झाल्याचे आता विद्यमान आमदार विसरले आहेत. मात्र आम्ही राष्ट्रीय नेते, ८४ वर्षाचे संघर्ष योद्धे शरदचंद्रजी पवार साहेब यांना त्यांच्या अडचणीच्या काळात साथ देण्याचा निर्णय घेतला आहे. पवार साहेबांची शक्ती आपल्या पाठीशी असल्याने काळजी करण्याचे कारण नाही, असे हर्षवर्धन पाटील यांनी नमूद करताच मतदारांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

जे पवार साहेबांना सोडून गेले त्यांचा समाचार घेताना हर्षवर्धन पाटील म्हणाले की , हिरोचा झिरो व झिरोचा हिरो करण्याची ताकद राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षामध्ये आहे. तालुक्यातील स्व-ार्थी पुढारी एका बाजूला तर जनता आपल्याबरोबर आहे. ही निवडणूक मतदारांनीच आपल्या हातात घेतल्याने आपला व राज्यात महाविकास आघाडीचा विजय कोणी रोखू शकत नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले देशाचे संविधान कोणी बदलू शकत नाही, अन आंम्ही ते बदलू देणार नाही, असा इशाराही हर्षवर्धन पाटील यांनी दिला.

यावेळी पक्षाचे इंदापूर तालुका कार्याध्यक्ष महारुद्र पाटील यांनी भाषणात सांगितले की, तालुक्याच्या लोकप्रतिनिधींनी ठराविक ठेकेदारांना घेऊन १० वर्षात रस्ते आणि कमिशन मधून मलिदा गोळा करण्याशिवाय दुसरे काम केलेले नाही. एकही दूध डेअरी, कारखाना काढला नाही. उलट विद्यमान लोकप्रतिनिधींनी हर्षवर्धन पाटील यांचे कारखाने कसे अडचणीत येतील यासाठी प्रयत्न केले, याचे आंम्ही साक्षीदार आह-ोत, कारण हर्षवर्धन पाटील यांचेविषयी शेतकऱ्यांमध्ये चीड निर्माण व्हावी, वा-तावरण गढूळ व्हावे, असा विद्यमान लोकप्रतिनिधींचा प्रयत्न होता. विद्यमान लोकप्रतिनिधी हे गोड बोले व विश्वासघातकी माणूस आहे, अशी टीका महारुद्र पाटील यांनी केली.



कर्मयोगी शंकररावजी पाटील कारखान्याचे संचालक छगन भोंगळे यांनी आपल्या जोरदार भाषणात सांगितले की, विद्यमान लोकप्रतिनिधींनी कोणालाही रोजगार दिला नाही, खडकवासल्याचे पाणी आले नाही, उलट त्यामुळे कॅनॉल बुजत चालला आहे. खडकवासला कालव्याला पाणी आणण्यासाठी हर्षवर्धन पाटील यांनाच विजयी करा, असे आवाहन छगन भोंगळे यांनी केले.

यावेळी पक्षाचे तालुकाध्यक्ष अँड. तेजसिंह पाटील, अशोक घो-गरे, प्रा. कृष्णाजी ताटे, हिरालाल पारेकर, संदीप कडवळे, मंगेश डोंगरे निलेश देवकर आदीसह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक सय्यद पठाण यांनी केले. त्यात त्यांनी विरोधकांवर शेलक्या शब्दात टीकास्त्र सोडले. यावेळी हर्षवर्धन पाटील यांचा सत्कार मच्छिंद्र अभंग, नाना पोंदकुले, ज्ञानदेव भोंगळे, मेहबूब पठाण, मेजर खंडू बोराटे, पप्पू पोंदकुले आदींनी केला. तत्पूर्वी, कार्यकर्त्यांनी काढलेल्या दुचाकी रॅलीत हर्षवर्धन पाटील यांनी सहभाग घेतल्याने, कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.